'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue - 264 : India's Sustainable Development Goal in 21st Century
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April-2021

# ई – अध्ययन : महत्व

## E-Learning : Importance

**डॉ. शिवाजी थोर**
Ph.D, M.Phil.,M.Com., M.A.(Eco),M.A.(Pol),
M.A.(Mar)., G.D.C.& A., B.Ed.(Gen), B.Ed.(Phy)
Head of Department of Comm.
Research Guide Pune University (Bus Adm & Business Practices)
Arts Science & Commerce College, Manmad
Tal. Nandgaon, Dist: Nashik (M.S.)
Mob. 7263982785
E-Mail. I.D : drshivajithore217@gmail.com

**प्रा. प्रकाश बढे**
NCC Officer
Asst. Prof. Dept of Geography
Arts Science & Commerce College, Manmad
Tal. Nandgaon, Dist: Nashik (M.S.)
Mob. 72196667902
Email ID : prakashgeo03@gmail.com

### 1. प्रास्ताविक (Introduction)

21व्या शतकाचा विचार करतात स्पर्धेच्या युगात यशस्वी होऊन टिकून राहण्यासाठी अध्यापन व अध्ययन या दोन्हीही प्रक्रियेत प्रभावी बदल होणे काळाची गरज आहे सध्या सर्व क्षेत्रात झपाट्याने प्रगती होत आहे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करीत आहे. मोठ्या प्रमाणात संगणकाचा वापर व नवीन सॉफ्टवेअर वापरण्याची कौशल्य आत्मसात करण्याची गरज आहे. दिवसंदिवस बाजारपेठांमध्ये विविध प्रकारची उत्पादने मोठ्या प्रमाणात येत आहे. त्यामुळे ग्राहकांच्या अपेक्षा वाढत आहे. ते समाधानी राहण्यासाठी उत्पादनही त्यांनी कसा पणाला लावून उत्पादनात बदल करीत आहे. यासाठी नवीन नवीन कौशल्य आत्मसात करण्याची काळाची गरज आहे.

समाजात प्रत्येकाची विशिष्ट अशी वैशिष्ट्ये अनुभवयाला येतात. आजचा समाज हा माहिती तंत्रज्ञानावर आधारित असणारा समाज आहे. जीवनाच्या सर्व घटकांना माहिती तंत्रज्ञानाने स्पर्श केला आहे. मानवाच्या प्रत्येक कृतीशी माहिती तंत्रज्ञानाचा संबंध येतो.

आधुनिक काळात माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाच्या वापरात एवढी वाढ झाली आहे की साक्षरतेचा निकषच माहिती तंत्रज्ञान व संप्रेषणाचे ज्ञान असणे हा झाला आहे .शिक्षण क्षेत्रावर तर माहिती तंत्रज्ञान व संप्रेषनाचा प्रचंड प्रभाव दिसून येतो.

आज संगणकाची ओळख प्राथमिक स्तरातील अभ्यासक्रमातून केली जात आहे. प्रत्येक स्तरानुसार त्याच्या वापराची व्याप्ती वाढत आहे. आज संगणक ज्ञान वापर याबाबत साक्षर असणे स्पर्धेच्या काळात गरज बनत चालली आहे.

आधुनिक काळात माहिती तंत्रज्ञान व संप्रेषण याचा फक्त अभ्यासक्रम पुरताच विचार न राहता त्याचा एक अध्ययन अध्यापनाची प्रभावी साधन म्हणून वापर होत आहे. याचाच एक भाग म्हणून ई -अध्ययन ही एक संकल्पना सर्वच क्षेत्रात परिचयाची व उपयोगी ठरत चालली आहे. यामुळे स्पर्धेच्या युगात यशस्वी होऊन टिकून ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यात उत्पादक यशस्वी होत आहे.

### 2. उद्देश:- (Objectives)

1. ई-अध्ययन संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. ई-अध्ययनाचे प्रकारांचा अभ्यास करणे.
3. ई-अध्ययनाची वैशिष्ट्येचा अभ्यास करणे.
4. ई-अध्ययनाच्या माध्यमाचा अभ्यास करणे.